**नियमित दिवाणी दावा क्र. १५२/२०२१ मधील नि. ३० वरील आदेश.**

(**CNR–MHAH** २३–०००३७३–२०२१)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, दाव्यातील प्रतिवादी क्र. ८ सुलोचना अनिल येडे ह्या दिनांक २७/०६/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. त्यांचे वारस अभिलेखावर मुदतीत घेणे गरजेचे होते, परंतु वादी यांचे कायदेशीर अज्ञानामुळे व मृत्यू दाखला उशीराने मिळाल्याने वारस मुदतीत घेणे शक्य झाले नाही. झालेला उशिर जाणिवपुर्वक केलेला नाही. अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ८ चे वारस अभिलेखावर घेण्याकामी झालेला उशिर माफ करण्यात यावा, असे वादी यांचे कथन आहे.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवुन कथन केले की, अर्ज खोटा आहे. वादीने जाणिवपुर्वक उशिराने अर्ज दिला आहे. उशिराचे कारण योग्य व बरोबर नाही. विलंब होण्याचे दृष्टीने अर्ज देण्यास उशीर केला आहे. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्यात यावा असे प्रतिवादी यांचे कथन आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, वादी यांनी नि. २९/१ येथे दाखल मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र. ८ ह्या दिनांक २७/०६/२०२१ रोजी मयत झाल्या आहेत. सदर दाखला दिनांक १९/०७/२०२२ रोजी देण्यात आला आहे. प्रस्तुत दावा वाटपाचा व मनाई हूकूमासाठी आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र. ८ चे वारस आवश्यक पक्षकार आहेत. अर्जात नमूद विलंबाचे कारण रास्त असल्याचे दिसून येते. सर्व आवश्यक पक्षकाराचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक असल्याने झालेल्या विलंब

माफ करणे न्यायोचित ठरणार आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१. नि. ३० येथील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. मयत प्रतिवादी क्र. ८ सुलोचना अनिल येडे यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द करुन घेणेकामी झालेला विलंब माफ करण्यात येत आहे.

GIRISH MADHUKAR SADHALE
Digitally signed by GIRISH MADHUKAR SADHALE
Date: 2023.08.05 18:46:28 +0530

श्रीगोंदा. **( जी. एम. साधले )**

दिनांक ०५/०८/२०२३. सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,

श्रीगोंदा, जि. अहमदनगर.